आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२१ मे २०२६ - गुरूवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- भारतीय उद्योगांना युरोप, पूर्व भूमध्य सागरी, आखाती आणि उत्तर आफ्रिकेतल्या देशांची बाजारपेठ खुली करून देण्यासाठी साहाय्य करण्याच सायप्रसच्या अध्यक्षांचं आश्वासन/ दोन्ही देशांच्या उद्योगसंस्थांमध्ये सहा सामंजस्य करार

- ईबोला विषाणू प्रादुर्भावाबाबत आरोग्य सेवा महासंचालनालयाकडून दक्षतेचा इशारा

- नीट पेपरफुटीप्रकरणी आणखी एकाला अटक

- पुलवामा हल्ल्यातला आरोपी हमजा बुरहान याची पाकव्याप्त काश्मीरमध्ये अज्ञात व्यक्तींकडून गोळ्या झाडून हत्या

**आणि**

- झारखंडमधे २७ नक्षलवाद्यांचं आत्मसमर्पण

**<><><><><><>**

भारतीय उद्योगांना केवळ युरोपच नव्हे तर पूर्व भूमध्य सागरी, आखाती आणि उत्तर आफ्रिकेतल्या देशांची बाजारपेठ खुली करून देण्यासाठी सायप्रस साहाय्य करेल, अशी ग्वाही सायप्रसचे अध्यक्ष निकोस क्रिस्टोदौलीदेस यांनी दिली. मुंबईत आयोजित सायप्रस भारत बिझनेस फोरमच्या कार्यक्रमात ते बोलत होते. मुंबईत येत्या १ सप्टेंबरपासून सायप्रस व्यापार केंद्र सुरु करण्याची घोषणाही त्यांनी केली. सायप्रसकडे सध्या युरोपीय महासंघाच्या परिषदेचे अध्यक्षपददेखील आहे. त्यामुळे सायप्रससोबतच युरोपीय महासंघाचे सहकार्य देखील भारताला मिळेल असं निकोस यांनी यावेळी सांगितलं. सायप्रसच्या उद्योगसमूहांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करावी असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी यावेळी केलं. महाराष्ट्र हे ६६०अब्ज डॉलर्स अर्थव्यवस्थेचं राज्य असून देशाच्या औद्योगिक उत्पादनात सुमारे ३० टक्के, तर परकीय गुंतवणुकीत ४० टक्के वाटा राज्याचा आहे. ऊर्जा क्षेत्रात

महाराष्ट्र ९३ गिगावॅट निर्मिती क्षमतेकडे वाटचाल करत आहे. त्यापैकी ५२ टक्के ऊर्जा नवीकरणीय स्त्रोतांतून निर्माण होत आहे. तसंच आंतरराष्ट्रीय एज्यु सिटी, मेडी सिटी आणि जीसीसी सिटी सारखे जागतिक दर्जाचे प्रकल्प उभारले जात असल्याची माहिती फडनवीस यांनी दिली. यावेळी दोन्ही देशांमधल्या उद्योगसंस्था आणि कंपन्यांमध्ये सहा सामंजस्य करार करण्यात आले.

यावेळी मुख्यमंत्री म्हणाले…

**होल्ड- बाईट - मुख्यमंत्री**

**<><><><><><>**

इबोलाचा प्रसार असणाऱ्या देशांमधून येणाऱ्या प्रवाशांच्या बाबतीत दक्षता बाळगण्याचं आवाहन आरोग्य सेवा महासंचालनालयानं केलं आहे. डेमॉक्रेटिक रिपब्लिक ऑफ काँगो, युगांडा आणि दक्षिण सुदान यासारख्या देशांमधून येणाऱ्या प्रवाशांनी इबोलाच्या लक्षणांशी साधर्म्य असणाऱ्या तक्रारी केल्यास त्यांना ताबडतोब वैद्यकीय मदत उपलब्ध करुन देण्याच्या सूचनांचाही यात समावेश आहे. ताप, डोकेदूखी, स्नायूदुखी, कारणाशिवाय रक्तस्त्राव किंवा उलटी अशी लक्षणे दिसल्यास प्रवाशांनी विमानतळ आरोग्य अधिकारी किंवा हेल्थ डेस्कला आधी सूचित करावं असं आरोग्य सेवा महासंचालनालयाने म्हटलं आहे. प्रवासानंतरही २१ दिवसांच्या आत अशी लक्षणे आढळल्यास वैद्यकीय मदत घ्यावी आणि आपल्या प्रवासाबाबत माहिती सार्वजनिक आरोग्य केंद्राकडे द्यावी असंही आवाहन संचालनालयाने केलं आहे.

आफ्रिकेतल्या इबोलाच्या उद्रेकाच्या पार्श्वभूमीवर नवी दिल्लीत २८ ते ३१ मे या कालावधीत आयोजित केलेली चौथी भारत-आफ्रिका फोरम परिषद पुढे ढकलण्यात आल्याची माहिती परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं एका निवेदनाद्वारे दिली आहे.

**<><><><><><>**

नीट पेपरफुटी प्रकरणी सीबीआयने लातूरचे बालरोगतज्ज्ञ डॉ. मनोज शिरुरे यांना ताब्यात घेतलं आहे. लातुरातल्या शिरुरे यांच्या रुग्णालयात जाऊन यापूर्वी सीबीआयने कसून चौकशी केली होती. नंतर गेले दोन दिवस पुण्यात झालेल्या तपासानंतर शिरुरे यांना अटक केल्याचं आमच्या वार्ताहराने कळवलं आहे.

<><><><><><>

राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत भारताने क्षयरोगाच्या उच्चाटनासाठी जागतिक स्तरावरचा सर्वात मोठा क्षयरोग तपासणी आणि प्राथमिक रुग्ण शोध कार्यक्रम हाती घेतला आहे, असं प्रतिपादन केंद्रीय आरोग्य मंत्री जे.पी नड्डा यांनी केलं. जिनिव्हा इथे जागतिक आरोग्य परिषदेच्या ७९व्या सत्रात ‘फुफ्फुसांच्या आरोग्याबाबत मंत्रीस्तरावरचे दृष्टीकोन’ यावरच्या सत्रात ते बोलत होते. ज्यांना क्षयरोगाचा धोका जास्त आहे अशांपर्यंत पोचण्यासाठी घराघरातून तपासणी करणारी फिरती तपासणी पथके ,  जनजागृती मोहिमा यावर या कार्यक्रमात भर दिला जात आहे, असं त्यांनी सांगितलं.

<><><><><><>

माजी प्रधानमंत्री दिवंगत राजीव गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज समाज माध्यमावर त्यांना आदरांजली वाहिली. काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, राहुल गांधी, प्रियांका गांधी यांच्यासह अनेक नेत्यांनी आज राजीव गांधी यांचं स्मारक असलेल्या वीर भूमी इथं जाऊन आदरांजली वाहिली.

<><><><><><>

पुलवामा हल्ल्यातला एक आरोपी हमजा बुरहान याची आज पाकव्याप्त काश्मीरमध्ये अज्ञात व्यक्तींनी गोळ्या झाडून हत्या केली. मुजफ्फराबादमधल्या एका महाविद्यालयासमोर त्याची कार वाहतूक कोंडीत अडकली असताना दुचाकीवरुन

आलेल्या दोन हल्लेखोरांनी त्याच्यावर गोळ्या झाडल्या. हल्लेखोरांनी त्याच्यावर अंदाधूंद गोळीबार केला त्यात त्याचा जागीच मृत्यू झाला.

१४ फेब्रुवारी २०१९ पुलवामा इथं भारतीय लष्कराच्या ताफ्यावर झआलेल्या हल्ल्यात ४० सैनिकांचा मृत्यू झाला होता.

<><><><><>

झारखंड प्रभारी पोलिस महासंचालकांच्या उपस्थितीत आज रांची इथं २७ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केलं. हे सर्व सरकारने बंदी घातलेल्या सीपीआय-माओवादीशी संबधित होते अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. अनेक प्रकरणांमध्ये आरोपी असणाऱ्या या नक्षलवाद्यांनी 'ऑपरेशन नवजीवन' अंतर्गत शरणागती पत्करली आहे. एकूण नक्षलवाद्यांपैकी २२ जण चकमकीत मारले गेले आहेत, ४४ जणांना अटक झाली आहे तर २९ जणांनी या वर्षात आत्मसमर्पण केलं आहे असं नमूद करत शिल्लक राहिलेल्या थोड्या नक्षलवाद्यांनी मुख्य प्रवाहात यावं असं आवाहन पोलिस अधिकाऱ्यांनी केलं आहे.

<><><><><>

पश्चिम आशियातला संघर्ष कायमस्वरूपी संपवण्यासाठी अमेरिकेनं पाकिस्तानमार्फत इराणला नवीन युद्धविराम प्रस्ताव पाठवल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं दिली आहे. इराण सध्या या प्रस्तावावर विचार करत असून त्याने अद्याप कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. दरम्यान पाकिस्तानचे गृहमंत्री मोहसीन नक्वी सध्या तेहरानमध्ये असून लष्करप्रमुख आसिम मुनीर यांनी इराण दौऱ्याचं नियोजन केलं आहे.

अमेरिकेने इराणचा गोठवलेला निधी मोकळा करून सागरी वाहतुकीतले अडथळे दूर करावेत आणि इराणी जहाजांवरचे हल्ले थांबवावेत अशा मागण्या याआधी इराणने अमेरिकेला पाठवलेल्या प्रस्तावात केल्या होत्या. लेबनॉनसहित सर्व आघाड्यांवरचं युद्ध थांबवणे ही आपली प्राथमिकता असल्याचं इराणच्या

परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते इस्माईल बघाइ  यांनी म्हटलं आहे. अमेरिकेवर आपला विश्वास नाही परंतु तरीही इराण ही चर्चा सुरु ठेवेल असं बघाई यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय योग दिनाला एक महिना राहीला असताना आज दुबईतल्या इंडियन पीपल्स फोरमने योगासनांचा कार्यक्रम आयोजित केला होता. दुबईतल्या ऐन मोक्याच्या ठिकाणी झालेल्या या कार्यक्रमात शारीरिक आणि मानसिक आरोग्य तसंच जागतिक एकता, आणि कल्याणाचा संदेश देण्यात आला. यंदाचा १२वा योग दिन असून 'स्वास्थ्य, सामंजस्य आणि जागतिक शांतते'साठी योग अशी यंदाची संकल्पना आहे.

**<><><><><>**

गडचिरोली जिल्ह्यात एक एसटी बस उलटून झालेल्या अपघातात आज तीन प्रवाशांचा मृत्यू झाला तर ३३ जण जखमी झाले. मृतांमधे सात महिन्यांच्या अर्भकाचा समावेश आहे. एका वळणावर चालकाचं नियंत्रण सुटून बस कडेचा लोखंडी कठडा तोडून कोसळली. जखमींना जवळच्या रुग्णालयात नेलं, तिथंच त्यापैकी तिघांचा मृत्यू झाला.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज अहमदाबादच्या नरेंद्र मोदी मैदानावर गुजरात टायटन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात सामना सुरु आहे. चेन्नई सुपर किंग्जनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा गुजरात टायटन्सच्या ८ षटकात बिनबाद ८१ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

ठाण्याच्या न्यायालयानं महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे आणि इतर आरोपींना आज दोषमुक्त केलं. २००८ साली रेल्वे भरती परीक्षा काळात

कल्याण स्थानकावर मनसेच्या काही कार्यकर्त्यांनी काही उमेदवारांना मारहाण केल्याच्या आरोपाखाली राज ठाकरे यांच्यासह आठ जणांवर खटला सुरु होता. या प्रकरणात राज ठाकरे यांनी प्रक्षोभक भाषण केल्याचा, तसंच उमेदवारांना मारहाण झाल्याचे कोणतेच आरोप सरकार पक्षाला सिद्ध करता आले नाही त्यामुळे न्यायालयानं या सर्वांची निर्दोष मुक्तता केली.

**//<><><><><><>//**